नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३५२ Issue - 352 | वार शुक्रवार दि. १५ मे २०२६ Blow- Friday Date 15 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# अक्कलकोट येथे सोलापूर जिल्ह्यातील २,७८४ कोटी रुपये किंमतीच्या ५ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे भूमिपूजन

## सचिनदादांच्या मागणीला साहेबांची 'ऑन द स्पॉट' मंजुरी! ; अक्कलकोटच्या विकासाचे 'महापर्व': ₹१३८२ कोटींच्या विकासकामांचा ऐतिहासिक सोहळा!





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /कमलाकर सोनकांबळे

रस्ते-महामार्गाच्या निर्मितीतून सोलापूर जिल्ह्याच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करत असताना आज अक्कलकोट येथे सोलापूर जिल्ह्यातील २,७८४ कोटी रुपये किंमतीच्या ५ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे भूमिपूजन केले. खासदार डॉ. प्रणिती शिंदे जी, खासदार ज्योती वाघमारे जी, कर्नाटकच्या राज्य धोरण आयोगाचे अध्यक्ष श्री बी आर पाटील जी, आमदार श्री सुभाष देशमुख जी, आमदार श्री विजय देशमुख जी, आमदार श्री समाधान आवताडे जी, आमदार श्री सचिन कल्याणशेट्टी जी, आमदार श्री राजू खरे जी, आमदार श्री देवेंद्र कोठे जी तसेच लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

'प्रधानमंत्री गती शक्ती' मास्टर प्लॅन अंतर्गत विकसित होत असलेल्या सुरत-चेन्नई आर्थिक कॉरिडॉरचा एक प्रमुख घटक राष्ट्रीय महामार्ग-१५० सी अंतर्गत हसापूर ते बडादल दरम्यानचा प्रस्तावित सहा-पदरी ग्रीनफील्ड कॉरिडॉर. हा आधुनिक कॉरिडॉर महाराष्ट्र आणि कर्नाटकला अधिक प्रभावीपणे जोडेल, ज्यामुळे प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सोयीस्कर होईल. सुरत आणि चेन्नई दरम्यानचे अंतर सुमारे ३९० किलोमीटरने कमी झाल्यामुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल आणि व्यावसायिक घडामोडींना चालना मिळेल. एक्सेस कंट्रोल्ड प्रणालीवर आधारित हा महामार्ग अत्याधुनिक अभियांत्रिकी मानकांनुसार विकसित केला जात आहे, ज्यामुळे प्रवासाचा वेळ अंदाजे २८ तासांवरून १७ तासांपर्यंत कमी होईल. शिवाय, सुधारित वाहतूक व्यवस्थापन आणि कमी झालेले कार्बन उत्सर्जन पर्यावरण संरक्षणाला चालना देईल. पर्यावरणीय संतुलन आणि वन्यजीव संवर्धनाचे महत्त्व लक्षात घेऊन, वनक्षेत्रातील वन्यजीवांच्या सुरक्षित हालचाली सुनिश्चित करण्यासाठी, तसेच वन्यजीवांची सुरक्षा आणि विना अडथळा वाहतूक प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी विशेष वन्यजीव निवारण संरचना देखील बांधल्या जात आहेत. हा आर्थिक कॉरिडॉर वस्त्रोद्योग केंद्रे, औद्योगिक समूह, मेगा फूड पार्क्स आणि औषध निर्माण व वैद्यकीय क्षेत्रासह विविध विकास केंद्रांना जोडून नवीन गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी निर्माण करेल. विमानतळ, बंदरे आणि इतर वाहतूक जाळ्यांशी सुधारित जोडणीमुळे या प्रदेशाची औद्योगिक आणि व्यावसायिक क्षमता आणखी मजबूत होईल. याव्यतिरिक्त आज भूमिपूजन करण्यात आलेल्या इतर महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये राष्ट्रीय महामार्ग ५४८-बी अंतर्गत वाघदरी-अक्कलकोट-टोलनूर रस्ता आणि राष्ट्रीय महामार्ग ४६५ अंतर्गत मोहोळ-बसवनगर-वालसांग रस्ता यांचा समावेश आहे. याशिवाय, दुधनी येथे रेल्वे उड्डाणपूल आणि उर्वरित रस्त्याचे श्रेणी सुधार व नूतनीकरण तसेच बोरी-उमरगे येथे बोरी नदीवर १ किमी लांबीच्या भव्य पुलाचा समावेश आहे.

या प्रकल्पांमुळे प्रादेशिक संपर्क व्यवस्था मजबूत होईल आणि सोलापूरच्या विकासाला गती मिळेल. प्रवास अधिक सुरक्षित आणि सोपा होईल, वेळ आणि इंधनाची बचत होईल, तसेच शेतकरी, व्यापार, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रांना महत्त्वपूर्ण लाभ मिळतील. युवक आणि सर्वसामान्य जनतेसाठी नवीन संधी निर्माण करून, हे विकास प्रकल्प सोलापूरला आधुनिक आणि आत्मनिर्भर जिल्हा म्हणून नवी ओळख होईल पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय महामार्ग आणि आधुनिक पायाभूत सुविधांच्या निर्मितीतून सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे सांगितले.

### ७५ वर्षांची उपेक्षा गडकरींनी दूर केली : आमदार सचिन कल्याणशेट्टी

**अक्कलकोट तालुका गेली अनेक दशके विकासापासून वंचित राहिला होता, एकही राष्ट्रीय महामार्ग नसलेल्या या तालुक्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तब्बल सहा महामार्यांनी जोडून ऐतिहासिक कार्य केले आहे, असे गौरवोद्गार आमदार सचिन कल्याणशेष्ट्री यांनी काढले , दर्जेदार रस्त्यांमुळे शेतकन्यांच्या ऊस व इतर कृषी उत्पादनांच्या गती मिळाली असून भाविकांची गैरसोय मोठ्या प्रमाणात दूर झाली आहे. अक्कलकोट हा राज्याच्या शेवटच्या टोकावरील तालुका असल्याने आजवर दुर्लक्षित राहिल्या, मात्र गडकरी यांनी या भागाच्या विकासासाठी दिलेले योगदान अतिशय मोठे असल्याचे कल्याणशेट्टी यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी अक्कलकोट-गाणगापूर रस्त्याच्या पुनर्बांधणीची मागणी केली. त्यावर गडकरी चांनी तत्काळ मंजूरी जाहीर करताच्च उपस्थितांमध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला.**

### विकासकामांचा धडाका... शब्दाचा पक्का!

**विकासाचा हा सोहळा केवळ भूमिपूजनापुरता मर्यादित राहिला नाही, तर आमदार श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोटच्या जनतेसाठी मांडलेल्या आणखी तीन महत्त्वाच्या मागण्यांना नितीन गडकरी साहेबांनी भरसभेत तात्काळ मंजुरी दिली. दादांच्या प्रभावी पाठपुराव्यामुळे वळसंग ते तांदुळवाडी रस्ता (१५० कोटी), अक्कलकोट ते दुधनी रस्ता (१०० कोटी) आणि गाणगापूर रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी साहेबांनी जागेवरच निधी आणि आदेशांची घोषणा केली. लोकप्रतिनिधीचा शब्द आणि सरकारचा विश्वास यांचा हा अनोखा संगम आज अक्कलकोटवासीयांनी अनुभवला. अक्कलकोटच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असणारे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून सुरू झालेली ही विकासाची गंगा तालुक्याचा कायापालट करणार आहे.**

**अक्कलकोट आणि सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला आज नवी झळाळी मिळाली आहे! केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. ना. नितीन गडकरी जी यांच्या प्रमुख उपस्थितीत अक्कलकोट मतदारसंघातील भव्य रस्ते विकास प्रकल्पांचे भूमिपूजन उत्साहात संपन्न झाले. सुमारे १३४ कि.मी. लांबीच्या आणि ₹११३२ कोटींच्या या प्रकल्पांमुळे संपूर्ण जिल्ह्याचे दळणवळण आता अधिक सक्षम आणि गतिमान होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने वागदरी-अक्कलकोट-तोळनूर मार्गाचे दुपदरीकरण, मोहोळ-वळसंग मार्गाचे विस्तारीकरण, दुधनी येथील रेल्वे उड्डाण पूल आणि बोरी उमरगे येथील नवीन पुलाच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला.**

### महत्वाचे मुद्दे ....

- **डिजिटल प्रणालीने ऑनलाईन भूमिपूजन करण्यात आले**
- **खा प्रणिती शिंदे यांनी मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मनात असताना त्याची विरोधाना किती प्रेमाने वागणूक देतात व कामे करतात हे सांगितले**
- **रस्ता करत असताना त्या जवळील तलाव गाळ मुक्त करून त्याची वापर कसे करण्यात आले याची व्हिडीओ दाखवण्यात आले**
- **येत्या तीन वर्षात सोलापूर जिल्ह्यासाठी एक लाख कोटीचे कामे करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले**
- **भाजपचे सर्व आमदार एकाच मंचवर आल्याचे दिसून येत होते**
- **आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे कामाचे कौतुक कार्यक्रम ठिकाणी चालू होते**

# महाराष्ट्रातील ९.८६ कोटी मतदारांची पडताळणी होणार

### मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण मोहिमेची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष संक्षिप्त पुनरीक्षण-तिसरा टप्पा' (एसआयआर फेज-३) राबवण्याचे अधिकृत आदेश दिले आहेत. या महत्त्वाकांक्षी मोहिमेत महाराष्ट्राचा प्रामुख्याने समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख ६४ हजार ४१३ मतदारांच्या नोंदी अद्ययावत केल्या जाणार आहेत. चालू असलेल्या जनगणनेच्या 'हाऊस लिस्टिंग' प्रक्रियेचा विचार करून आयोगाने हे वेळापत्रक आखले असून, हवामानाची प्रतिकूलता लक्षात घेता केवळ हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि लडाख या भागांना या टप्प्यातून वगळण्यात आले आहे. महाराष्ट्रातील या मोहिमेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून एकूण ९७,९२४ बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांच्या माहितीची प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांच्या ९६,९४९ बूथ लेव्हल एजंट्सची (बीएलए) मदत घेतली जाणार आहे. आयोगाच्या वेळापत्रकानुसार, २० जून ते २९ जून २०२६ या काळात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण होईल, त्यानंतर ३० जूनपासून प्रत्यक्ष घरोघरी भेटी देऊन पडताळणी करण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. ही मोहीम २९ जुलैपर्यंत असणार आहे.

राज्यातील मतदारांसाठी ५ ऑगस्ट २०२६ ही तारीख महत्त्वाची ठरणार आहे, कारण याच दिवशी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. यानंतर ४ सप्टेंबरपर्यंत नागरिकांना आपल्या नावातील दुरुस्ती, पत्ता बदल किंवा नवीन नाव नोंदणीसाठी दावे आणि हरकती सादर करता येतील. सर्व हरकतींचा निपटारा केल्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्राची अंतिम मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध केली जाणार आहे.

निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले प्रतिनिधी नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि सर्वसमावेशक होईल. या मोहिमेमुळे आगामी निवडणुकांसाठी राज्याकडे एक त्रुटी मुक्त आणि अद्ययावत मतदार डेटाबेस उपलब्ध होणार आहे. पहिल्या दोन टप्प्यांत देशातील ५९ कोटी मतदारांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, आता तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि पंजाब यांसारख्या मोठ्या राज्यांमध्ये कामाला वेग येणार आहे.

# उत्तर प्रदेशात वादळाचा हाहाकार; तब्बल ९४ जणांचा बळी

### प्रयागराज आणि अयोध्येसह ३० जिल्ह्यांमध्ये वादळी वारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशात दोन प्रकारच्या हवामानाचा अनुभव येत आहे. बुधवारी, प्रयागराज आणि अयोध्यासह उत्तर प्रदेशातील ३० जिल्ह्यांमध्ये वादळामुळे ९४ लोकांचा मृत्यू झाला. प्रयागराजमध्ये सर्वाधिक १७, तर भदोहीमध्ये १६ मृत्यूंची नोंद झाली. बरेलीत ताशी ८० किमी वेगाने आलेल्या वादळाने एका तरुणाला आणि पत्र्याच्या शेडला उडवून लावले. राज्यातील बांदा शहरात तापमान ४५.४ओउ पर्यंत पोहोचले. आज (१४ मे) ५१ जिल्ह्यांसाठी तीव्र वादळ आणि पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे.

भदोही जिल्ह्यात भीषण वादळात १५ जणांचा मृत्यू

उत्तर प्रदेशातील भदोही जिल्ह्यात आलेल्या भीषण वादळात १५ जणांचा मृत्यू झाला आणि ८ जण जखमी झाले. या नैसर्गिक आपत्तीत १६ जनावरांचाही बळी गेला. सायंकाळी हवामान अचानक बदलले आणि जोरदार वारे वाहू लागले. या भीषण वादळामुळे जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये झाडे आणि विजेचे खांब कोसळले.

भदोहीमध्ये अनेक ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या असून, त्यात १५ जणांचा मृत्यू झाला आहे. भदोहीच्या सुरियावान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खरगसेनपट्टी येथे एका घरावर झाड कोसळल्याने एक महिला आणि तिच्या दोन मुलींचा मृत्यू झाला. औराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत, कोसळणाऱ्या झाडाखाली उभे असलेल्या लोकांचा मृत्यू झाला.

राजस्थानमध्येही तीव्र उष्णता आणि उष्णतेची लाट जाणवत आहे. बुधवारी सलग चौथ्या दिवशी जैसलमेर हे देशातील सर्वात उष्ण शहर ठरले, जिथे तापमान ४६.१ओउ पर्यंत पोहोचले. हवामान विभागाच्या माहितीनुसार, आज बिकानेर, जोधपूर, जैसलमेर आणि बारमेरमध्ये तीव्र उष्णतेसाठी रेड अलर्ट लागू आहे. १३ जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे.

मध्य प्रदेशातील २५ हून अधिक जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट

दरम्यान, मध्य प्रदेशातील २५ हून अधिक जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट पसरली असून, ती १८ मे पर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे. बुधवारी खजुराहोमध्ये तापमान ४५.४ओउ होते. आज इंदूर, उज्जैन, धार आणि रतलाममध्ये उष्णतेच्या लाटेसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये रात्री तापमान वाढण्याचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हरियाणात गेल्या २४ तासांत कमाल तापमानात १.१ओउ ने वाढ झाली आहे. राज्यातील ५ शहरांमध्ये तापमान ४०ओउ पेक्षा जास्त होते, त्यापैकी नारनौलमध्ये ते ४२.५ओउ होते. राज्यात १७ मे पासून उष्णतेच्या लाटेसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. बिहारमधील पूर्णिया-कटिहारसह ७ जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तराखंडच्या डोंगराळ जिल्ह्यांमध्ये आज पावसासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## संपादकीय....

### निसर्गाचा प्रकोप

देशात दोन प्रकारच्या हवामानाचा अनुभव येत आहे. प्रयागराज आणि अयोध्यासह उत्तर प्रदेशातील ३० जिल्ह्यांमध्ये वादळामुळे ९४ लोकांचा मृत्यू झाला. प्रयागराजमध्ये सर्वाधिक १७, तर भदोहीमध्ये १६ मृत्यूंची नोंद झाली. बरेलीत ताशी ८० किमी वेगाने आलेल्या वादळाने एका तरुणाला आणि पत्र्याच्या शेडला उडवून लावले. राज्यातील बांदा शहरात तापमान ४५.४ओउ पर्यंत पोहोचले. ५१ जिल्ह्यांसाठी तीव्र वादळ आणि पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशातील भदोही जिल्ह्यात आलेल्या भीषण वादळात १५ जणांचा मृत्यू झाला आणि ८ जण जखमी झाले. या नैसर्गिक आपत्तीत १६ जनावरांचाही बळी गेला. सायंकाळी हवामान अचानक बदलले आणि जोरदार वारे वाहू लागले. या भीषण वादळामुळे जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये झाडे आणि विजेचे खांब कोसळले. भदोहीमध्ये अनेक ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या असून, त्यात १५ जणांचा मृत्यू झाला आहे. भदोहीच्या सुरियावान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खरगसेनपट्टी येथे एका घरावर झाड कोसळल्याने एक महिला आणि तिच्या दोन मुलींचा मृत्यू झाला. औराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत, कोसळणाऱ्या झाडाखाली उभे असलेल्या लोकांचा मृत्यू झाला. राजस्थानमध्येही तीव्र उष्णता आणि उष्णतेची लाट जाणवत आहे. बुधवारी सलग चौथ्या दिवशी जैसलमेर हे देशातील सर्वात उष्ण शहर ठरले, जिथे तापमान ४६.१ओउ पर्यंत पोहोचले. हवामान विभागाच्या माहितीनुसार, आज बिकानेर, जोधपूर, जैसलमेर आणि बारमेरमध्ये तीव्र उष्णतेसाठी रेड अलर्ट लागू आहे. १३ जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. दरम्यान, मध्य प्रदेशातील २५ हून अधिक जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट पसरली असून, ती १८ मे पर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे. बुधवारी खजुराहोमध्ये तापमान ४५.४ओउ होते. आज इंदूर, उज्जैन, धार आणि रतलाममध्ये उष्णतेच्या लाटेसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये रात्री तापमान वाढण्याचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्यात १७ मे पासून उष्णतेच्या लाटेसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# अक्कलकोटमध्ये अनुदानित संस्थांकडून पालकांची आर्थिक लूटमार?

## शिक्षणाचा काळा बाजार, पालकांमध्ये मोठी नाराजी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनिधी

शासनाचे नियम धाब्यावर बसवून अक्कलकोट तालुक्यातील अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये सध्या प्रवेशाच्या नावाखाली पालकांची मोठी आर्थिक लूट? सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे.

यामुळे सर्वसामान्य आणि गोरगरीब पालकामध्ये मोठी नाराजी दिसून येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,पहिली ते पाचवी,पाचवी ते दहावी आणि दहावी ते बारावी अशा प्रत्येक टप्प्यावर प्रवेशासाठी संस्थाचालकांकडून पैशांची मागणी केली जात आहे.उदाहरण' पाचवीतून सहावीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून सहा ते साडेआठ हजार रुपयांपर्यंतची रक्कम बेकायदेशीरपणे उकळली जात आहे.तसेच ॲडमिशन फार्म ५० रुपयांनी दिली जात आहे, प्रत्यक्षात मोठी लूट सुरू आहे.

आपल्या पाल्याचे शैक्षणिक नुकसान होईल किंवा त्याला वर्गात त्रास दिला जाईल,या भीतीने पालक तक्रार करण्यास तयार नाहीत.हीच भीती संस्थाचालकांच्या पथ्यावर पडत असून 'हम करे सो कायदा' अशा थाटात मनमानी कारभार सुरू आहे. वशिल्याच्या लोकांना प्रवेशासाठी सूट दिली जात असताना, गोरगरीब पालकांना मात्र आर्थिक पिळवणुकीचा सामना करावा लागत आहे.

या गंभीर प्रकाराकडे शिक्षण विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.पालक स्वतःहून तक्रार करण्यास पुढे येत नाहीत, तर आम्ही काय करणार?अशी उडवाउडवीची उत्तरे शिक्षण विभागाकडून दिली जात आहेत.जिल्ह्याचे शैक्षणिक अधिकारी केवळ वातानुकूलित कार्यालयात बसून कारभार हाकत असून, जमिनीवर काय परिस्थिती आहे याकडे त्यांचे पूर्णतः दुर्लक्ष आहे,

एका नामांकित शैक्षणिक संस्थेमध्ये वार्षिक पेपर फी न भरल्याने वर्ग शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका (मार्कलिस्ट) देण्यास नकार दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आधी फी भरा, मगच मार्कलिस्ट न्या,अशी भूमिका शिक्षकांनी घेतल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

विशेष म्हणजे, ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत दुजाभाव केला जात असल्याची तक्रार पालक करत आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे काही पालकांना फी भरण्यास विलंब झाला आहे,मात्र त्याचा फटका विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला बसत आहे.

या गंभीर प्रकाराकडे शिक्षणाधिकाऱ्यांचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. विद्यार्थ्यांचे हित जोपासण्याची जबाबदारी असलेले अधिकारी या विषयावर मूग गिळून बसल्याने, शिक्षणाधिकारी झोपी गेले आहेत का? असा संतप्त सवाल पालक विचारत आहेत.

अक्कलकोटमधील हा 'सावळा गोंधळ' आणि शैक्षणिक क्षेत्रातील ही लूटमार कधी थांबणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी संस्थांवर कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

शासकीय तिजोरीतून अनुदान लाटायचे आणि दुसरीकडे गोरगरीब विद्यार्थ्यांची लूट करायची, हा दुटप्पी धंदा आता कायमचा थांबला पाहिजे. शिक्षण विभागाने आता केवळ बघ्याची भूमिका न घेता.

गुप्त पद्धतीने चौकशी करावे भ्रष्ट संस्थांची मान्यता थेट रद्द करण्याचे धाडस दाखवावे.

**तालुक्यातील काही खाजगी शैक्षणिक संस्थांकडून पुढील प्रवेशासाठी पालकांकडे आर्थिक मागणी केली जात असल्याच्या तक्रारी येत आहेत.तक्रार केल्यास मुलाला प्रवेश मिळणार नाही किंवा वर्गात त्रास दिला जाईल, या भीतीपोटी अनेक पालक गप्प राहत असल्याचे चित्र आहे. यावर अक्कलकोट पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी कडक भूमिका घ्यावी.**

**- ज्योतिबा पारखे सामाजिक कार्यकर्ता अक्कलकोट**

**शाळांनी प्रवेशासाठी अवाजवी पैशांची मागणी करणे किंवा तक्रार करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना त्रास देणे हा कायदेशीर गुन्हा आहे. जर कोणत्याही शैक्षणिक संस्थेत अशा प्रकारे पालकांची अडवणूक होत असेल, तर त्यांनी न घाबरता पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार करावी. पालकांची आणि विद्यार्थ्यांची ओळख गोपनीय ठेवून संबंधित संस्थेवर कडक कारवाई केली जाईल. फीच्या नावाखाली होणारी आर्थिक पिळवणूक खपवून घेतली जाणार नाही. मुलांचे शैक्षणिक हित आणि त्यांची सुरक्षितता हीच आमची प्राथमिकता आहे.**

**प्रशांत आरबाळे -गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती अक्कलकोट**

# बोरीवलीची रखडलेली पाणीपुरवठा योजना अखेर मार्गी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव



भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील बोरीवली गावासाठी जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेली नवीन पाणीपुरवठा योजना अखेर प्रत्यक्षात मार्गी लागली असून सध्या पाईपलाईन टाकण्याचे काम वेगाने सुरू आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या योजनेला सामाजिक कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गती मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

बोरीवली गावाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता, सन २००१ मध्ये उभारण्यात आलेली जुनी पाणीपुरवठा योजना अपुरी पडत होती. गावातील ८ ते ९ हजार नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करण्यात अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे जलजीवन मिशन अंतर्गत सुमारे ९ कोटी रुपयांची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती.

या योजनेत नवीन उंच पाण्याची टाकी, फिल्टर प्लांट तसेच विस्तृत पाईपलाईन टाकण्याचा समावेश करण्यात आला आहे.

मात्र विविध तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय प्रक्रियांमुळे ही योजना गेली तीन ते चार वर्षे रखडून पडली होती. परिणामी नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन बोरीवली येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड. जियाद सोहराब गुजर यांनी विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा केला. संबंधित विभाग, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींशी समन्वय साधत त्यांनी योजनेचे काम सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून योजना आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यात पोहोचली आहे. सध्या पाच्छापूर येथील मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तानसा जलवाहिनीपासून बोरीवली गावापर्यंत नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. सरपंच तथा प्रशासक अन्वर अब्दुल पिंजारी आणि ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू असून ग्रामस्थांकडूनही समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

ही योजना पूर्णत्वास गेल्यानंतर बोरीवली गावातील नागरिकांना नियमित, स्वच्छ आणि पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होणार असल्याने अनेक वर्षांचा पाण्याचा प्रश्न सुटण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, योजनेचे उर्वरित काम वेळेत पूर्ण होण्यासाठी शासनाने उर्वरित निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

या कामासाठी माजी पंचायत समिती सदस्य मुशीर नाचण, अकबर अब्दुल्ला खोत, दिलीप दिवे, मुसद्दीक मुल्ला, साद कासकर, अली हरे, मसिह नाचण, कैस बर्डी, मुजीब कासकर तसेच बोरीवली ग्रामपंचायत कमिटीने विशेष सहकार्य केले आहे.

# स्वेरीमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती साजरी



पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन अँन्ड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती साजरी करण्यात आली.

प्रारंभी अक्षरमित्र अमित बोरखडे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी साहित्यिक प्रशांत वाघमारे म्हणाले की, 'छत्रपती संभाजी राजे हे सुसंस्कृत, पराक्रमी होते. त्यांनी कमी वयात सुद्धा वेगवेगळ्या भाषा अवगत केल्या. ते एक वीर म्हणून जगले. 'छत्रपती संभाजी महाराज की जय' एवढी घोषणा जरी कानी पडले तर मन प्रफुल्लीत होऊन जाते.' असे सांगून त्यांनी 'छत्रपती' या आदरार्थी शब्दाचा सविस्तर अर्थ स्पष्ट केला. अक्षरमित्र अमित बोरखडे म्हणाले की, 'छत्रपती संभाजी राजांचे कार्य पाहता ते शेवटपर्यंत पराक्रमी राजे राहिले. शत्रू पुढे ते कधीही डगमगले नाहीत. त्यांनी कमी कालावधीत आपल्या अफाट ताकतीच्या जोरावर स्वराज्याचे रक्षण केले.' असे सांगून छत्रपती संभाजी महाराजांच्या धाडसी कामगिरीवर प्रकाश टाकला. यावेळी मधुकर पकाले, स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या पाचही महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, सांस्कृतिक कार्यक्रम विभागाचे प्रमुख प्रा. प्रवीण मोरे, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते. डॉ.नीता तळवलकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरला वैशिष्ट्यपूर्ण शाखेचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी):- महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्था महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे गेल्या १२० वर्षापासून कार्यरत आहे. राज्यात मोठ्याप्रमाणात साहित्य परिषदेच्या शाखा असून त्यामध्ये विविध आणि वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करणार्या शाखेला साहित्य परिषदेच्या वर्धापन दिना निमित्त पुरस्कार देण्यात येतो. त्याच अनुषंगाने यंदाच्या वर्षीचे राजन लाखे पुरस्कृत कै. बाबुराव लाखे स्मरणार्थ महाराष्ट्र साहित्य परिषद वैशिष्ट्यपूर्ण शाखा म्हणून सोलापूर जिल्ह्यातील मसाप दक्षिण शाखेला निवडण्यात आले असून दि. २६ मे रोजी या पुरस्काराचे वितरण बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे करण्यात येणार असल्याची माहिती मसाप पुणे चे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांनी जाहिर केले. त्याबाबतचे पत्र मसाप दक्षिण शाखेला प्राप्त झाले आहे.

मराठी भाषा, साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांच्या जतन आणि संवर्धनासाठी गेल्या १२० वर्षापासून महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे कार्यरत आहे. अनेक थोर लेखकांनी आपल्या आयुष्यातील बहुमोल वेळ देवून वाङ्मय सेवकांची भूमिका पार पाडत या संस्थेला नावारूपाला आणले आहे. केवळ पुणे मर्यादा न ठेवता महाराष्ट्र साहित्य परिषदेने राज्यातील अनेक जिल्ह्यात शाखांचे जाळे पसरवले. त्यातच सोलापूरमध्ये सर्वाधिक शाखा निर्माण झाल्या. दक्षिण सोलापूर शाखेने गेल्या अनेक वर्षात शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, लोकजागृती असे विविध उपक्रम घेवून आपली वेगळी ओळख निर्माण केली. दरवर्षी दिपावलीच्या निमित्ताने पहाटेच्या प्रवचनमाला ही आगळी वेगळी संकल्पना सत्यात आणून ज्येष्ठ निरूपणकार विवेकजी घळसासी यांची अमृतवाणी हा कार्यक्रम अखंडपणे सुरू ठेवून यशस्वी केला. महाराष्ट्राचे प्रतिभावंत साहित्यिक कवी विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या कथा, कवितांवर आधारीत विंदा एक स्मरणसाखळी हा बहारदार कार्यक्रम तसेच महाराष्ट्राचे सुपुत्र असलेले आणि दुबईत मसाला किंग म्हणून ओळख निर्माण करणारे धनंजय दातार यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम सोलापूरातील उद्योजकांना मार्गदर्शक ठरला. मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर यांनी लेखन केलेल्या तीन पुस्तकाचे प्रकाशन अगदी थाटात आणि वेगळेपणाने करण्यात आले. त्यानंतर दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीच्या वृत्तनिवेदिका, सुप्रसिध्द निवेदिका ज्योती आंबेकर यांचे भाषण कला शिबीर हे शिबीर, ज्येष्ठ कवी अशोक नायगांवकर यांचा मिश्कीली आणि कविता, कवियत्री शांताबाई शेळके यांच्या कविता आणि गद्यलेखनावरील आधारीत असलेला अनवट शांताबाई, जगप्रसिध्द लेखक माहिती तंत्रज्ञान अभ्यासक अच्युत गोडबोले यांचे ए आय ची जादू आणि उद्याचे जग या विषयावर व्याख्यान,विशेष सरकारी वकील पद्मश्री उज्वल निकम यांची प्रकट मुलाखत तर नव वकीलांना प्रेरणादायी ठरली.इर्मेजिनियस स्टुडिओ कोल्हापूर प्रस्तुत हिंदी गाण्यावर आधारीत दास्तान ए इश्क कार्यक्रम,पटकथाकार तसेच असोसिएट डायरेक्टर कुमार दवे यांचे व्याख्यान,नरहर कुरुंदकर एका विचारवंताची अपरिचित गोष्ट या साभिनय अभिवाचनाच्या नाट्यप्रयोग, भारतीय राजकारण आणि भारतीय इतिहासाची मांडणी करणारे राष्ट्रीय वक्ते पुष्पेंद्रजी कुलश्रेष्ठ यांचे व्याख्यानाने तर गर्दीचा रेकॉर्ड कायम केला, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी संघ यात्रे निमित्त संघ गंगा के तीन भगीरथ हे नाटक, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि सद्य परिस्थिती या विषयावर ज्येष्ठ अभिनेते आणि सावरकर भक्त शरद पोंक्षे यांचे व्याखान, सोलापूर रंगे नेत्यांच्या संगे या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमातून सोलापूरचे कर्तुत्ववान तीन सुपुत्र,माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख यांना एकाच मंचावर आणून एकत्रीतपणे त्यांची मुलाखत सोलापूरचे चौथे सुपुत्र ज्येष्ठ पत्रकार विवेक घळसासी यांनी घेवून राजकीय प्रगल्भता कशी असते हेच दाखवून दिले, बागेश्वर महाराज यांचे संतसंमेलन, १०० पेक्षा अधिक जन्मठेप शिक्षेसाठी प्रयत्न करणार्या ॲड. प्रदीप रजपूत यांची मुलाखत, देशभरात गाजलेल्या विविध आर्थिक घोटाळ्यावर प्रकाश टाकण्याचे काम आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग या पुस्तकाच्या माध्यमातून लेखिका डॉ.अपूर्वा जोशी यांची प्रकट मुलाखत नाशिक विभाग लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांनी घेतली,श्री सूक्त ते राष्ट्र सूक्त याविषयावर सविस्तर माहिती डॉ. रमा गोळवलकर यांनी यावेळी आपल्या व्याख्यानातून दिली. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि वि वा शिरवाडकर यांच्या जीवनावर व्याख्यानातून योगेश सोमण यांनी विस्तृतपणे माहिती दिली. कवी स्व.दत्ता हलसगीकर, कवी लक्ष्मीनारायण बोल्ली यांचे पुस्तक प्रकाशन आणि रामदास फुटाणे यांचे विविध कार्यक्रमाचे आयोजन, सर्वसामान्यांसाठी कार्यक्रमाचे आयोजन तर नेहमी होते परंतु कारागृहातील बंदी असलेल्यांना काही वेळ विरंगुळा मिळावा या हेतुने महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने शाखेचे उपाध्यक्ष तथा हास्यसम्राट प्रा.दीपक देशपांडे यांचा हास्यकल्लोळ तसेच सानिका कुलकर्णी आणि रसिका कुलकर्णी यांचे अभंगाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तत्कालीन जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी यांच्या सहकार्याने सुरू झालेल्या दक्षिण सोलापूर शाखेने असे विविध उपक्रमाचे आयोजन सोलापूरकरांसाठी आयोजित करण्यात आले.

### पुण्यात २६ मे रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे च्या वर्धापन दिनी पुरस्कारचे वितरण

कार्यक्रमाचे नेटके नियोजन, शिस्तबध्दता, तेच तेच पणा न आणता विविधता आणून प्रत्येकवेळी नवनवीन संकल्पना राबवणे, जास्तीत जास्त आणि नवनवे प्रेक्षकांपर्यत कार्यक्रम पाहोचवणे, पारंपारिक पध्दती सोबतच आधुनिकतेचा समावेश करणे, कार्यक्रमाचे आयोजन करताना वेळेचे योग्य नियोजन आणि दिलेल्या वेळेतच कार्यक्रम सुरू करून समारोप करण्याची परंपरा, वर्षभरात राबवलेल्या कार्यक्रमाचे अवलोकन करून वेळोवेळी त्याचा हिशोब, ऑडीट आणि अहवाल तयार करून महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांच्याकडे वेळेत पाठवणे, या सर्व महत्वाच्या गोष्टीचा विचार करून महाराष्ट्र साहित्य परिषदेने दक्षिण सोलापूर शाखेला यंदाचा कै. बाबुराव लाखे वैशिष्ट्यपूर्ण शाखेचा पुरस्कार जाहिर करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा मंगळवार दि. २६ मे रोजी बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे.

सोलापुरकरांच्या प्रेमामुळेच हा पुरस्कार - रेणुका महागांवकर

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने विविध उपक्रम आणि कार्यक्रम राबवण्यात येतात त्याला सोलापूरकर दिलखुलासपणे प्रतिसाद देतात आणि कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होतात. सोलापूरकर रसिक श्रोत्यांच्या प्रेमामुळे साहित्य परिषदेने दखल घेवून दक्षिण सोलापूर शाखेला वैशिष्ट्यपूर्ण शाखा म्हणून पुरस्कार जाहिर केला. यामुळे आणखी नवनवीन कार्यक्रम घेण्याची प्रेरणा मिळाली आहे. अशी प्रतिक्रिया मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर यांनी व्यक्त केली

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पालखी महामार्गामुळे वारकरी भाविकांची वाट सुखकर : केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी

## केंद्रीय रस्ते व वाहतूक मार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली पालखी महामार्गाची पाहणी...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर पंढरपूर, श्री स्वामी समर्थ अक्कलकोट, यांसारखी महत्त्वाची देवस्थाने असलेल्या सोलापूर जिल्ह्यासाठी रस्ते जाळे मजबूतीचे महत्त्व मोठे आहे. या बाबी लक्षात घेऊन बांधण्यात आलेले हे महामार्ग प्रकल्प जिल्ह्यातील आध्यात्मिक स्थळांपर्यंत पोचण्यास भाविकांसाठी सुलभ झाले आ-हेत. श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पालखी घेऊन येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी वेगळा रस्ता केला आहे. यामुळे वारकरी भाविकांची वाट सुखकर झाल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले.








संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केली. यावेळी त्यांच्या समवेत, पालकमंत्री जयकुमार गोरे, खा-सदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, माजी खासदार रणजी-तसिंह निंबाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी विजया पांगरकर, सचिन इथापे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रादेशिक अधिकारी अंशुमन श्रीवास्तव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी तसेच अधिकारी, मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी केंद्रीय वाहतूक मंत्री गडकरी म्हणाले, तुळजापूर, पंढरपूर, अक्कलकोट हे रस्ते यापूर्वी मोठ्या प्रमाणात खराब झाले होते. त्यामुळे वारकरी भाविकांना वाहतुकीच्या समस्येमुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या मार्गावरील रस्ते करण्याची संधी मिळाली तर ते रस्ते चांगले कर अशी इच्छा माझ्या आईनी व्यक्त केली होती. पांडुरंगाच्या व आईच्या आशीर्वादाने मला रस्ते करण्याची संधी मिळाली. सद्या पालखी महामार्गाचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करण्यात येतील. पालखी महामार्गावरील काही ठिकाणची रखडलेली कामे डिसेंबर अखेर पूर्ण करण्यात येतील. तसेच वाखरी ते पंढरपूर रस्त्याचे काम रेल्वे प्रशासनाकडून काही परवानगी आलेल्या नाहीत त्याबाबत तात्काळ पाठपुरावा करून काम मार्गी लावण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी माळशिरस तालुक्यातील घुले वस्ती येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेल्या पुरातन विहिरीचे जतन व संवर्धन करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून माळशिरस तालुक्यातील घुले वस्ती या ठिकाणी पालखी महामार्गात विशेष रचना करून पुरातन विहिरीचे जतन व संवर्धन करण्यात आले. तसेच पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव येथील बाजीराव विहिरीचे ही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून जतन व संवर्धन करण्यात आले आहे. या दोन्ही विहिरींची पाहणी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. यावेळी केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण देखील करण्यात आले.

### केंद्रीय रस्ते रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी बसने प्रवास करत पालखी महामार्गाची केली पाहणी

**पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करावा, महानगरात मेट्रोने प्रवास करावा असे आवाहन केले. मोदींच्या आवाहनानुसार, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी बसने प्रवास करत संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या निम्म्यावर आणण्याचे आदेश दिले. केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सुरक्षा कर्मचारी, अधिकारी यांच्यासह बसने प्रवास केला.**

# केंद्रीय रस्ते व वाहतूक मार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केंद्रीय रस्ते व वाहतूक मार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी श्रींची मूर्ती व उपरणे देऊन त्यांचा सन्मान केला.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, नगराध्यक्षा प्रणिता भालके, माजी आमदार प्रशांत परिचारक,तसेच मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# शौर्य नंदागवळी ९२.२० टक्के घेऊन प्रावीण्य प्राप्त केले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : जवळील येरंडी येथील शौर्य स्वप्ना संगम नंदागवळी या विद्यार्थ्यांने ९२.२० टक्के प्राप्त करून माध्यमिक शालान्त परिक्षा नागपूर बोर्ड, जी. एम. बी. इंग्लिश हायस्कूल अर्जुनीमोरगाव येथून प्रावीण्य मिळवत पास झाला.



सदर विद्यार्थी हा मध्यम वर्गीय कुटुंबात वाढत आहे. उत्तम प्रकारे अभ्यास करून वर्ग दहावीमध्ये मेरीट प्रावीण्य प्राप्त केले. तो उत्तम गायक व संगीतकार आहे.

कला कौशल्य क्षेत्रात भरारी घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्याच्या प्रावीण्य प्राप्त करून पास झाल्याने त्यांच्या परिवारातील अंजीरा रेवचंद नंदागवळी, स्वप्ना संगम नंदागवळी तसेच मित्र परिवारानी खूप खूप अभिनंदन केले.

# आमच्या परिचारिका, आमचे भविष्य-सक्षम परिचारिका वाचवतात जीव : डॉ. गौरी कहाते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी - आजच्या बदलत्या आरोग्य व्यवस्थेत परिचारिकांची भूमिका केवळ रुग्णसेवेपुरती मर्यादित नसून आरोग्य शिक्षण, जनजागृती, आपत्कालीन सेवा, मानसिक आधार आणि आरोग्य व्यवस्थापन यामध्येही त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. जागतिक नर्स दिनाच्या निमित्ताने सर्व स्तरांतून परिचारिकांचा सन्मान करणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांना आवश्यक सुविधा व प्रोत्स-ाहन देणे ही काळाची गरज आहे. यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने यावर्षी आमच्या परिचारिका, आमचे भविष्य - सक्षम परिचारिका वाचव-तात जीव. हे घोषवाक्य जाहीर केले आहे. ही संकल्पना परिचारिकांच्या सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित करते असे प्रतिपादन सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. गौरी कहाते यांनी केले.

त्या फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूर व गीतगंगा सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक परिचारिका दिनाच्या कार्यक्रमात करून पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे सचिव जयेश पटेल हे होते. यावेळी व्यासपीठावर एफ. पी. ए. आय. सोलापूर शाखेच्या व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, सदस्य आण्णासाहेब कोतली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, गीतगंगा फाउंडेशनचे अध्यक्ष व्यंकटेश कंची, खजिनदार वेणूगोपाल उत्तूर, सल्लागार चन्नेश इंडी, डॉ. कविता चंडक आदी उपस्थित होते.

यावेळी सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभाग, खाजगी रुग्णालये, फॅमिली प्लॅनिंग दवाखाना व इतर क्षेत्रातील परिचारिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दिवसभर घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात परिचारिकांसाठी संगीत खुर्ची, एका बॉलने ग्लास पाडणे, एका मिनिटात जास्तीत जास्त टिकल्या लावणे, बाटली व रिंग, ग्लास व बॉल, एका गाडीपेटीच्या काडीने जास्तीत जास्त मेनबत्या पेटविणे व होम मिनिस्टर अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कु. दीपाली वानखेडे ही होम मिनिस्टरची मानकरी ठरली. शीतल मागा-डे व रेखा आंधळकर या संगीत खुर्चीच्या विजेत्या तर निलोफर शेख




जागतिक नर्स दिन कार्यक्रमातील विजेत्या परिचारिकांसह मान्यवर दिसत आहेत.

व स्नेहा जटला या इतर खेळातील विजेत्या ठरल्या. विजेत्यांना आकर्षक भेटवस्तू, साडी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. शेवटी परिचारिकांनी भरतनाट्यम, मिक्स गाण्यावर नृत्य, मिमिक्री व गायन सादर केले.

स्वागत कल्पना गडगडे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार व्यंकटेश कंची यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आकाश गायकवाड, श्रुती कोल्हापूरे, सुनीता पाटील, प्रीती चौधरी, बबिता दुपारगुडे, रमा गायकवाड, जिया शेख यांनी परिश्रम घेतले.

**पंढरपूर तीर्थक्षेत्र विषयी धोरणात्मक दृष्टिकोन ठेवून वाहतूकीचा सकारात्मक विकास करणे आवश्यक**

# पंढरपूर -मंगळवेढा मतदार संघातील राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गाच्या विकासासाठी हजारो कोटी निधीची केंद्रीयमंत्री ना. नितीन गडकरी यांच्याकडे आमदार समाधान आवताडे यांची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/प्रतिनिधी : पंढरपूर तीर्थक्षेत्र व मंगळवेढा संत भूमीतील राष्ट्रीय महामार्ग व राज्य मार्गाच्या चौपदरीकरण व बाह्यवळण रस्त्याच्या विकास कामांसाठी हजारो कोटी निधीची मागणी केंद्रीय रस्ते , वाह-तूक व राजमार्ग मंत्री ना.नितीन गडकरी यांच्याकडे पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आ-वताडे यांनी आज केली.

आमदार समाधान आवताडे यांनी केलेल्या मागणीत पंढरपूर तीर्थक्षेत्र असून महाराष्ट्र व भारतातील भाविक श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने पंढरपूर येथे येतात. पंढरपूरकडे येणारी राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग व्यापक रूंदीकरणाची नाहीत.त्यामुळे वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली असून अपघात दुर्घटना वाढल्या आहेत. अरुंद रस्त्यामुळे भाविकांची गैरसोय होते. पंढरपूर तीर्थक्षेत्र विषयी धोरणात्मक दृष्टिकोन ठेवून वाहतूकीचा सकारात्मक विकास करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय महामार्ग एन एच ५६१ ए टेंभूर्णी पासून पंढरपूर - मंगळवेढा - उमदी महामार्गाचे चौपदरीकरण आवश्यक आहे. हा राष्ट्रीय महामार्ग अरुंद असल्याने अपघाताच्या प्रमाण वाढले आहे. आषाढी,कार्तीकी व अन्य एकादशी निमित्त येणाऱ्या वारकरी संप्रदायातील दिंडी, पालखी यांच्या सोयीसाठी टेंभूर्णी पासून पंढरपूर -मंगळवेढा - उमदी पर्यंत चौपदरीकरण रस्त्याच्या विकासासाठी निधी मंजूर करावा. तसेच पंढरपूर शहरालगत बाह्यवळण रस्त्याची आवश्यकता असून पंढरपूर शहरातील वाहतूक सुलभता करिता गरजेचे आहे.

तसेच मंगळवेढा या संत भूमीतील रस्ते विकसित करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ कलम १५(१) अन्वये मंगळवेढा नगरपरिषद परिघस्त सोलापूर जिल्हा प्रादेशिक योजना सन २००५ साली मंजूर आहे.सदर योजना अंतर्गत मंगळवेढा शहरास ३० मीटर रुंदीचा बाह्यवळण रस्ता प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने मंगळवेढा - पंढरपूर रस्त्यापासून पश्चिम दिशेस जुना घरनिंकी रस्त्या वरून मंगळवेढा - रत्नागिरी रस्त्यापर्यंत चौपदरीकरणासाठी निधी मंजूर करावा. जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याची कार्यवाही महाराष्ट्र शासन याच बाह्यवळण रस्त्यालगत करित असल्याने तात्काळ निधी मंजूर करणे आवश्यक आहे.त्याचप्रमाणे टेंभूर्णी पासून पंढरपूर -मंगळवेढा - उमदी चौपदरीकरण रस्ता मरवडे गावाच्या बाह्यवळणाने विकसित करावा अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी केली आहे.

# सोलापूर-अक्कलकोट चौपदरीकरण व अन्य प्रस्तावित महामार्गामुळे लोक सेवेतून स्वामीसेवेचे समाधान : ना. नितीन गडकरी

## श्री वटवृक्ष स्वामींचे दर्शन घेतल्यानंतर ना.नितीन गडकरी यांचे भावोद्गार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : विदर्भ व नागपुरात अनेक निस्सीम स्वामीभक्त आ-हेत. सर्व स्वामी भक्तांप्रमाणे मी व माझे कुटुंबीयही स्वामी समर्थांचे निस्सिम भक्त आहोत. आता केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री पदाची धुरा वाहताना रस्त्यांच्या माध्यमातून सर्व देश जोडण्याचे महत्त्वाचे प्रकल्प हाती घेतलेले आहे. त्या माध्यमातून सोलापूर ते अक्कलकोट या चौपदरी करणाच्या रस्त्याचे काम हाती घेऊन अत्यंत कमी कालावधीत पूर्ण करून स्वामी दर्शनाकरिता अक्कलकोट ला येणाऱ्या भाविकांना सुखकर प्रवासाची सोय या चौपदरीकरणामुळे उपलब्ध झाल्याने व अन्य प्रस्तावित म हामार्गामुळे लोकसेवेतून स्वामी सेवेचे मानसिक समाधान लाभले असल्याचे भावोद्गार देशाचे केंद्रीय व रस्ते वाहतुक मंत्री ना.नितीन गडकरी यांनी काढले.

ते नुकतेच अक्कलकोटला येवून येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी ना.नितीन गडकरी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. या प्रसंगी बोलताना ना.गडकरी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात ना.गडकरी यांनी नागपूर मधील स्वामी धामच्या विविध नूतन उपक्रमांच्या शुभारंभप्रसंगी ना.गडकरी स्वतः व मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे या उभयतांच्या उपस्थिती बद्दलच्या आठवणींनाही उजाळा दिला. पुढे बोल-ताना गडकरींनी मी राज्याचा सार्वजनिक बांधकाममंत्री असताना माझ्या आई एकदा अक्कलकोटला स्वामींच्या दर्शनाकरिता आल्या होत्या. त्या काळात प्रवासादरम्यान सोलापूर-अक्कलकोट - गाण-गापूरचा रस्ता अत्यंत खराब असल्याने अक्कलकोटचा रस्ता चौपदरीकरण व नीटनेटका व्हावा अशी त्यांची इच्छा होती. तसा मनोदय त्यांनी माझ्या समोर व्यक्त केला होता, त्यामुळे सोलापूर-अक्कलकोट या चौपदरीकरण रस्त्यामुळे आईंचे स्वप्नही पुर्ण झाल्याचे समाधान असल्याचे मनोगत व्यक्त करून यापुढेही माझ्याकडून विविध माध्यमातून स्वामी सेवा घडत राहो अशा प्रकारचे मनोगत व्यक्त केले. यावेळी त्यांच्यासमवेत सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, राज्यसभा खासदार प्रा.डॉ.ज्योतीताई वाघमारे,

आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, आमदार सुभाष बापू देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष बंटी राठोड,

प्रथमेश इंगळे, भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, नगरसे-ेवक महेश हिंडोळे, नगरसेवक अविनाश मडीखांबे, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी बापू पवार, सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अक्कलकोटचे पोलीस निरीक्षक दीपक भिताडे, अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार, मंदिर समितीचे मंदार महाराज पुजारी, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा.शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, आद-ींसह भाविक भक्त उपस्थित होते.

## आमदार अभिजीत पाटील यांच्या मागणीला यश टेंभुर्णी ते पंढरपूर चार पदरी होणार महामार्ग



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माढा मतदारसंघातील अतिशय महत्त्वाचा टेंभुर्णी ते पंढरपूर चार पदरी महामार्ग ४८ किलोमीटर लांबीचा रस्ता मंजूर करण्यात आला असून ही घोषणा केंद्रीय रस्ते वाह-तूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी फलटण पत्रकार परिषदेत केल्याबद्दल आमदार अभिजीत पाटील यांनी आभार मानले.

आमदार अभिजीत पाटील यांनी गडकरी साहेबांसोबत आज फलटण ते पंढरपूर प्रवास केला असून अनेक गोष्टींवर सकारात्मक चर्चा केल्याचे सांगितले. दिलखुलास साहेबांनी प्रतिसाद दिला त्याबद्दल माढा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी आभार मानले.

## जिल्ह्यात कायमस्वरूपी कृती टीम स्थापनेचे आदेश, महसूल मंत्र्यांनी दिले सर्व अधिकाऱ्यांना आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव : अप्पर आयुक्त (महसूल) तथा पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष कोकण विभाग यांचेकडील आदेशाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी वर्षाचे ३६५ दिवस कायमस्वरूपी जलद कृती टीम स्थापन करण्याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त, ठाणे, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, कल्याण डोंबिवली, भिवंडी व उल्हासनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, पो-लीस आयुक्त ठाणे, कार्यकारी अभियंता, पीडब्ल्यूडी, सर्व तहसीलदार व सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती व्यवस्थापक, टोरेंट पॉवर लिमिटेड, उपनियमक, नागरी संरक्षण दल, ठाणे यांना आदेश निर्गमित केले आहेत.

राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष शरद धुमाळ यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शहरी तथा ग्रामीण भागातील आगी, पावसाळी आपत्ती, नैसर्गिक व मानवनिर्मिती आपत्तीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २०४५ नुसार वर्षाचे ३६५ दिवस कायमस्वरूपी जलद कृती टीम स्थापन करण्याबाबत निवेदन सादर केले होते. त्यामुळे अध्यक्षांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## प्रशासनाच्या धोरणांविरोधात धाराशिवमध्ये वीज कर्मचारी आक्रमक; महावितरण कार्यालयासमोर जोरदार 'द्वारसभा'




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव/प्रतिनिधी : म हाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते व अधिकारी कृती समितीच्या वतीने आज, गुरुवारी (१४ मे) महावितरणच्या मंडळ कार्यालयासमोर प्रशासकीय धोरणांचा निषेध करण्यासाठी जोरदार द्वारसभा घेण्यात आली. सानुग्रह अनुदान, खाजगीकरण आणि प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पुकारलेल्या या आंदोलनात कामगार, अधिकारी आणि अभियंते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आज सकाळ पासूनच सर्व वीज कर्मचारी काळ्या फिती लावून कामकाज केले, तसेच सायंकाळी ६ वाजता सुरू झालेल्या या द्वारसभेत कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या कामगार विरोधी धोरणांचा खरपूस समाचार घेतला. यावेळी विविध प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

**आंदोलनातील प्रमुख मागण्या:**

कर्मचाऱ्यांचे थकीत सानुग्रह अनुदान त्वरित मिळावे,९-१० ऑक्टोबर रोजीची ला-वलेली गैरहजेरी रद्द करण्यात यावी.३२९ सबस्टेशनचा एम पी आर तत्काळ मंजूर करावा,कर्मचारी पेन्शन योजना लागू करावी आणि प्रस्तावित पुनर्रचना व खाजगीकरणाचा डाव थांबवावा.

**कायदेशीर विरोध:** 'इलेक्ट्रिसिटी क्ट २०२५' मधील कामगार हिताविरोधी तरतुदींना तीव्र विरोध दर्शवण्यात आला.

प्रशासन वारंवार कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे. जर येणाऱ्या काळात आमच्या मागण्यांची दखल घेतली नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा कृती समि तीच्या वतीने देण्यात आला.

या द्वारसभेला महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते व अधिकारी कृती समितीतील सर्व संघटनांचे प्रतिनिधी, स्थानिक पदाधिकारी आणि जिल्ह्या-तील महावितरणचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अणदूर येथील अस्थी बौध्दविहाराचे काम शासनाच्या दिरंगाईमुळे रखडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी /एस. के. गायकवाड : अणदूर तालुका तुळजापूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थी बौद्ध विहारास क दर्जा मिळालेला असून या विहाराच्या विकास कामासाठी खासदार फंडातून ५० लाख रुपये मिळूनही केवळ शासनाच्या दिरंणाईमुळे अद्याप हे काम प्रलंबित आहे.

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थीवीहारास २०१६ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत क दर्जा प्राप्त झाला असुन अस्थीविहाराचे काम प्रलंबीत आहे, खासदार फंडातून पन्नास लाख रुपये निधी मंजूर असुनही शासनाकडून या कामी दिरंगाई होत आहे.

मराठवाड्यात फक्त दोनच ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्थिवीहार आहेत,उमरगा तालुक्यातील सालेगावचे अस्थीविहार कोट्यावधी निधीतुन पुर्णत्वास आले आहे पण अणदूर येथील अस्थिविहाराची अजून सुरुवातही झालेली नाही, येथील अस्थीविहाराची दुरावस्था झाली असुन याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे

जिल्ह्याचे खासदार ओम प्रकाश निंबाळकर यांनी ऑगस्ट २०२५ ला आपल्या खा-सदार फंडातून पन्नास लाख रुपये मंजूर केले असुन याबाबत जिल्हाधिकारी यांना क वर्ग तिर्थक्षेत्र कामाला मंजुरी द्यावी असे कळवले आहे , संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी जा-गेची पाहणी केली, परंतु पुढील कार्यवाही काही होत असल्याचे दिसत नाही एप्रिल महिन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त किंवा बुध्द जयंती निमित्त अस्थीविहाचा शुभारंभ होईल अशी अणदूरकरांना अपेक्षा होती,पण कुठलीच हालचाल दिसत नाही, भार-तरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संस्थेच्या वारंवार केलेल्या पाठपुराव्यामुळे अणदूर येथे भव्य दिव्य अस्ति विहार उभे राहणार आहे, तेंव्हा प्रशासनाने त्वरीत अणदूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थी विहाराच्या कामाचा शुभारंभ करुन अस्थीवीहार पुर्णत्वास न्यावे अशी मागणी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे संस्थेचे अध्यक्ष मधुकर कांबळे,हरीभाऊ बनसोडे, नागनाथ कांबळे, मनोहर बनसोडे, शामराव कांबळे,विद्याधर सुर्वे,आप्पाराव कांबळे,गोरख कांबळे,कल्पना सुर्यवंशी, भिमराव कांबळे यांनी केली आहे.

**हयात प्रमाणपत्र न दिल्यास निवृत्तीवेतन लाभ बंद होण्याची शक्यता**

## ऑनलाईन हयात दाखला सादर करण्याचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दि. ७ मे २०२६ अन्वये केंद्र व राज्य पुरस्कृत विविध निवृत्तीवेतन योजनांतील लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करता यावे, यासाठी इड (इशपशषळलळरीू डरींूररपि ीं) ही ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून लाभार्थी आता ऊळसळींरश्र डळषश उशीींळषळलरींश (ऊङउ) सहजपणे सादर करू शकणार आहेत.

राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना यांतील पात्र लाभार्थ्यांना इड पच्या माध्यमातून ऑनलाईन हयात प्रमाणपत्र सादर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना यांतील लाभार्थ्यांनाही ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

लाभार्थ्यांनी स्वतःच्या म ोबाईलद्वारे किंवा आपले सरकार सेवा केंद्र, सेतु सेवा केंद्र, नागरी सेवा केंद्र आदी ठिकाणी जाऊन ऑनलाईन हयात दाखला सादर करण्याची कार्यवाही तात्काळ करावी, असे आवाहन निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे.

ऑनलाईन हयात दाखला सादर न केल्यास संबंधित लाभार्थ्यांचा निवृत्तीवेतन लाभ बंद होऊ शकतो. त्यामुळे कोणतीही अडचण टाळण्यासाठी सर्व पात्र लाभार्थ्यांनी लवकरात लवकर ऊङउ प्रक्रिया पूर्ण करावी, असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## सलगर येथील सोलर कंपनी आदिवाशी शेत जमीन धारकांना रस्ता केला बंद; त्वरित रस्ता चालू करण्यासाठी रिपाइंची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सलगर/प्रतिनिधी -: अक्कलकोट तालुक्यातील सलगर येथील सोलर कंपनीला सुमारे दोन हजार एकर इतकी जमीने सोलर कंपनीला दिले आहे आहे ते काम कंपनी मार्फत चालू असून तिथ-ुनच सलगर गावाचे रहिवाशी श्री प्रल्हाद गंगाराम चव्हाण व श्री शंकर गंगाराम चव्हाण यांचे शेत जमीन असून या लोकांनी सोलर कंपनीला जमीन दिलेला नाही, तरी या लोकांना ये जा करण्यासाठी कंपनीने यांना वहीवटीचा रस्ता सोडावे या मागणीसाठी रिपाई आदिवासीच्या वतीने सोलर कंपनीला निवेदन दिले यावेळी आदिवासी ता अध्यक्ष मा कलप्पा चव्हाण सलगरचे ग्राम विकास अधिकारी मा शिवपुत्र ढोपरे, ग्रा पं सदस्या सौ योशोदाबाई चव्हाण, प्रल्हाद चव्हाण, शंकर चव्हाण,कमसर सीताराम चव्हाण,म ीनाबाई चव्हाण, पंचाप्पा डोंगराजे, सिद्धराम पाटील,गंगाराम चव्हाण आदी उपस्थित होते,

यावेळी बोलताना रिपाई आदिवासी ता अध्यक्ष कालप्पा चव्हाण म्हणाले कि वहीवटीचे रस्ते दोन चार दिवसात मार्गी लावा अन्यथा अक्कलकोट तहसीलदार कार्यलय समोर आदिवासी सामाज्याला घेऊन अमरण उपोषण करेल याची सो-लर कंपनीने नोंद घ्यावे.

असा इशारा कल्लप्पा चव्हाण यांनी केला.

**सोलर कंपनी स्थानिक रोजगार व व्हेंडर कोड न दिल्यास काम बंद आंदोलन: राजू बगळे**

### स्थानिक लोकांना रोजगार न दिल्यास काम बंद करू

**सलगर येथे दोन हजार एकर शेत जमीन मध्ये सो-लर काम चालू असून याठिकाणी स्थानिक लोकांना काम न देता बाहेरील लोकांना काम देण्यात येत असून ते त्वरित थाबविण्यात यावे सदर सोलर कंपनी त्याठिकाणी जे काम ाबाबत टेंडर निघणार आहेत त्याची प्रथम माहिती ग्रामपंचायत ग्रामस्थ याना माहिती देण्यात यावे व त्याना त्याठिकाणी जे काम रोजगार देण्यात यावे अन्यथा काम बंद आंदोलन करण्यात येईल**

**- राजू भगळे**
**रिपाई तालुका सरचिटणीस अक्कलकोट**